दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
सोमवार, दि.२७ एप्रिल २०२६


## थोडक्यात

### संत बंकटस्वामी महाराजांनी अनेक दीन- दुबळ्या व्यक्तींना आधार दिला-संजय पाचपोर महाराज

बीड । प्रतिनिधी

जीवनाला चांगला आधार मिळाला की ते पूजनीय होत. संत बंकटस्वामी महाराजांनी अनेक दीन- दुबळ्या व्यक्तींना आधार देऊन वारकरी संप्रदायात अधिकारी बनवलं.असे प्रतिपादन श्री ह भ प संजय महाराज पाचपोर यांनी केले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८२ व्या पुण्यतिथी उत्सवात भव्य रामकथेत पहिल्या दिवसाच्या कथेत ते बोलत



होते. यावेळी प्रमुख उपस्थिती श्री ह भ प महंत लक्ष्मण महारापीज मेंगडे, श्री ह भ प नाना महाराज कदम. सुरेश महाराज जाधव, श्रीकृष्ण महाराज यादव,रंजीत महाराज शिंदे, दिनेशांनद शास्त्री यांच्यासह हजारो भाविक भक्तांची उपस्थिती होती.

बीडच्या श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकटस्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी सोहळ्यात भव्य श्रीराम कथेत पहिल्या दिवसाची कथा पुष्पगुंपताना ते बोलत होते पुढे बोलताना. श्रवण महत्त्वाचा आहे मात्र ते प्रेमाने केले पाहिजे. श्रीराम कथा अत्यंत मनोभावे ऐका उधार होईल.जिवंत राहायचं असले तर पुन्हा पुन्हा जेवण केलं पाहिजे. तसं चांगल जगायचं असेल तर पुन्हा पुन्हा राम कथा ऐकली पाहिजे..चांगल जगणं महत्वाचं.. चांगल्या जगणाऱ्याचा इतिहास घडतो. समाजासाठी काम करून चांगल जगत असेल तर लोक विसरणार नाही. तसं चांगल श्रवण महत्वाचं आहे. या देशातच नव्हे तर जगात क्रांती व्हावा अस वाटत असले तर रामायण महत्वाच आहे.राम कथा जुनी नाही. आजच्या समाज व्यवस्थेला दिशादर्शक आहे. राम कथा प्रत्येक घराला मंदिर बनवणारी आहे. भावानी - भावाशी कस वागव राम कथा सांगते.आदर्शपत्नी कशी,आदर्श भाऊ कुटुंबातील आदर्श पात्रही राम कथा सांगते.आई-वडिलांची सेवा केली पाहिजे आणि त्यांचे वचन पाळला पाहिजे हे कृतीने जगासमोर आदर्श राम प्रभूने ठेवला.पहिल्या दिवसाही नमन केले पाहिजे.. कार्य निर्विघ्न पार पाडावे या साठी नमन केले पाहिजे. राम कथेत संत तुलसीदास सुद्धा नमन करतात. भागवत गीतेची सुरुवात धर्म शब्दापासून होते तसे शेवट मामा या शब्दापासून होतो धर्ममम, तुलसी रामायणाची सुरुवात वर्ण या शब्दापासून होते तर समारोप मानव या शब्दाने होतो. वाकड्या जीवनाला चांगला आधार मिळाला की ते पूजनीय होत.वक्र शिष्याला गुरु आधार देऊन वंदनीय पूजनीय करतात. असही संजय महाराज पाचपोर म्हणाले.

### एनएमएमएस परीक्षेत श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयाचे ५ विद्यार्थी अंतिम शिष्यवृत्तीस पात्र

अंबाजोगाई । प्रतिनिधी

राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक शिष्यवृत्ती परीक्षा म्हणजेच एनएमएमएस परीक्षेचा अंतिम निकाल नुकताच जाहीर झाला. यात श्री खोलेश्वर माध्यमिक विद्यालयातील ५ विद्यार्थी अंतिम शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरले आहेत.

या परीक्षेस विद्यालयातील १४३ विद्यार्थी बसले होते. त्यापैकी ५१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले. विशेष म्हणजे ९ विद्यार्थ्यांनी १०० पेक्षा अधिक गुण संपादन केले.



शिष्यवृत्तीसाठी पात्र विद्यार्थी:

शिंदे श्रुती बबन,चिल्लरगे सिद्धी महेश्वर,मायकर समिक्षा सुनील, कांगणे अनुमय दीपक,सरवदे ऋतुराज रमेश. आर्थिक दुर्बल घटकातील गुणवंत विद्यार्थ्यांना पुढील शिक्षणासाठी मदत मिळावी यासाठी शासनामार्फत दरवर्षी ही परीक्षा घेतली जाते. विद्यालयात यासाठी विशेष अभ्यास वर्ग व सराव परीक्षांचे आयोजन करण्यात येते. या विद्यार्थ्यांनी शिष्यवृत्तीस पात्र होऊन विद्यालयाची उज्ज्वल परंपरा कायम राखली आहे.

# देवठाणा-जैतापुर येथे झालेल्या निकृष्ट दर्जाच्या सिंगल फेज विजेच्या कामाची चौकशी करून संबंधित गुत्तेदार व अभियंता यांच्यावर कारवाई करा -दराडे

दिंद्रुड । प्रतिनिधी

देवठाणा-जैतापुर ग्रुप ग्राम पंचायत अंतर्गत विज कंपनीच्या वतीने करण्यात आलेले सिंगल फेज विजेचे काम संबंधित गुत्तेदार व अभियंता यांच्या संगनमताने अंदाजपत्रकास बगल देत अतिशय निकृष्ट दर्जाचे करण्यात आले आहे.तरी या निकृष्ट कामाची विज कंपनीच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी चौकशी करून संबंधित दोषींवर कडक व दंडात्मक कारवाई करावी.अशी मागणी सरपंच भागवत दराडे यांनी केली.

### इंजिनिअर व गुत्तेदार कांदे यांच्या संगनमताने जनतेच्या कामाची वाट लागणार -दराडे

देवठाणा-जैतापुर येथे केले जात असलेल्या सिंगल फेज विजेच्या कामात संबंधित इंजिनिअर व कांदे हे एकमेकांचे नातलग असुन, त्यांचे संगनमत असल्याने या कामात त्यांनी मनमानी कारभार करत अंदाजपत्रकास बगल देत अत्यंत निकृष्ट काम करत आहेत. याबाबत इंजिनिअरकडे तक्रार केल्यास ते उडवाउडवीचे उत्तर देतात. तरी वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या दोघांची चौकशी करून त्यांच्यावर कारवाई करावी.अशी मागणी भागवत दराडे यांनी केली.

यासंदर्भात प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात देवठाणा-जैतापुर ग्रुप ग्राम पंचायतचे सरपंच भागवत दराडे यांनी म्हटले की,देवठाणा-जैतापुर येथे नागरिक व शेतकऱ्यांना विजेची उपलब्धी व्हावी म्हणून विज कंपनीच्या वतीने सिंगल फेज विजेचे काम करण्यास येत आहे.मात्र सदरील काम ज्या गुत्तेदारास मिळाले त्या कांदे नामक गुत्तेदाराने मनमानी कारभार करत अंदाजपत्रकास बगल देत संबंधित इंजिनिअरशी संगनमत करून अतिशय निकृष्ट दर्जाचे काम करत आहे.या कामात क्रॉशिंगची गरज नसताना काम वाढविण्यासाठी गुत्तेदाराने क्रॉशिंग टाकली असुन, रस्त्याच्या कडेला पोल रोवण्याचे असताना गुत्तेदाराने मनमानी करत लोकांना त्रास होईल अशा पध्दतीने रस्त्याच्या मधोमध पोल रोवले असुन, त्यात चांगले सिमेंट क्रॉकिट करणे अवश्यक असताना, त्यात दगड गोटे टाकुन पोल उभारले तर कांही ठिकाणी केवळ माती व दगडच टाकले आहेत.तसेच पोलवरील तारा ओढताना ताण दिला नसल्याने तारा खालुन एखादे वाहन गेल्यास तारेचा स्पर्श होऊन, धोका अपघात होऊन, जिवीत हानी होण्याची शक्यता आहे.तसेच देवठाणा-जैतापुर व नागझरी तांडा येथे लाईट तारा ओढण्या खुप अवशकता असताना तेथे पोल उभारले नाही व तारा ही ओढल्या नसल्याने याचा लोकांना त्रास सहन करावा लागत आहे.ही विज लाईन ओढताना ११ मीटरचे पोल लावणे अंदाजपत्रकात नमूद असताना संबंधित गुत्तेदार ९ मीटरचे पोल उभारले आहेत. तर ज्या ठिकाणी डीपी बसवला आहे त्या ठिकाणी अरथिंग ही काढले नसल्याचे दिसत आहे.यासह इतर लहान सहान कामेही अत्यंत निकृष्ट व अंदाजपत्रकास बगल देत केली आहेत. यात संबंधित गुत्तेदार व संबंधित इंजिनिअर याचे संगनमत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.कारण संबंधित इंजिनिअर यांच्याकडे तक्रार केल्यास ते तक्रारदारासच उलट उत्तर देतात.एकुणच अशा प्रकारे निकृष्ट कामे झालेली आहेत. तरी विज कंपनीचे कार्यकारी अभियंता यांनी याची गंभीरतेने दखल घेऊन, देवठाणा-जैतापुर, कान्नापुर सिंगल फेज विजेच्या झालेल्या निकृष्ट कामाची चौकशी करून, हे निकृष्ट काम करणाऱ्या इंजिनिअर, कांदे नामक गुत्तेदार यांच्यावर कारवाई करून,गुत्तेदारास काळ्या यादीत समावेश करून,अंदाजपत्रकानुसार दर्जेदार काम करून द्यावे.अन्यथा यासाठी नागरिक तीव्र आंदोलन करतील.या दरम्यान होणाऱ्या परिणामाची सर्वस्व जबाबदारी आपणावर राहील. असा इशाराही पत्रकात सरपंच भागवत दराडे,गणेश सोळंके, रविशंकर सोळंके आदिंनी दिला आहे.

## प्रसिद्ध रामा इंटरनॅशनल हॉटेलमध्ये झालेल्या दिमाखदार सोहळ्यात आंधळे यांचा झाला गौरव

वडवणी । प्रतिनिधी

समाजामध्ये वेगवेगळ्या क्षेत्रांमध्ये व गाव विकासामध्ये उल्लेखनीय काम करणाऱ्या चर्चेतील चेहऱ्यांची निवड करून त्यांना सन्मानित करण्याचे ठरविले.त्यामध्ये वडवणी तालुक्यातील रुई गावचे आदर्श व युवा सरपंच मयूर आंधळे यांचीही निवड करण्यात आली होती.केंद्रीय मंत्री व विधान परिषदेचे सभापती यांच्या हस्ते मयुर आंधळे यांचा कुटुंबीयांसह गौरव करण्यात आला.

यावेळी दिव्य मराठीचे संपादक,प्रणव गोळवळकर,सीईओ नितिश जैन,जाहिरात विभागाचे प्रमुख सुभाष बोंद्रे,जाहिरात विभागाचे विभागीय व्यवस्थापक ज्ञानेश्वर देवकते, वडील माजी सरपंच श्री. शंकरराव आंधळे, आई सौ. छायाताई आंधळे, मोठे बंधू भाजपा युवा मोर्चा बीड अध्यक्ष श्री. संजय आंधळे, नगरसेवक श्री. अमोल आंधळे, पत्रकार जानकिराम उजगरे, श्री. शुभम जायभाये, कृष्णा आंधळे व इतर ग्रा प सदस्य यांच्यासह संपुर्ण टिम व मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.बुधवार दिनांक २२ एप्रिल रोजी छत्रपती संभाजीनगर येथील प्रसिद्ध असलेल्या फाईव्ह स्टार रामा इंटरनॅशनल या हॉटेलमध्ये झालेल्या दिमाखदार सन्मान सोहळ्यामध्ये.वडवणी तालुक्यातील रुई गावचे आदर्श व युवा सरपंच मयूर आंधळे यांचा चर्चेतील



चेहरा या सनमानसोळ्यात केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव व विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.त्यांनी रुई गावामध्ये केलेल्या स्वच्छता,पर्यावरण, शैक्षणिक, सामाजिक, वयोवृद्धांना मदत, रक्तदान, गुणवंतांचा सत्कार,रस्ते, अंडरग्राऊंड नाली,पथदिवे,मंदीर,सभाग्रह,गावच्या जत्रामधुन सामाजिक संदेश,कुस्त्यांची दंगल १०० विकास कामापैकी केलेले ५८ काम तर ५० सामाजिक उपक्रमापैकी ३८ केले कामे आशा आभुतपूर्व कामाची दखल दैनिक दिव्य मराठीने घेऊन ती समाजासमोर मांडली. याची दखल थेट केंद्रीय मंत्री व विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांनी घेतली आणि दैनिक दिव्य मराठीने आयोजित केलेल्या कार्यक्रमात यांचा गौरव केला.बोलताना विधान परिषदेचे सभापती राम शिंदे म्हणाले की,समाजात विविध क्षेत्रात उल्लेखनीय व अ वर्णनीय काम करणाऱ्या चर्चेतील चेहऱ्याची निवड दैनिक दिव्य मराठी ने केली ती अत्यंत योग्य व न्याय आहे.प्रत्येक क्षेत्रात काम करताना आपल्या कामावर प्रेम केल्यानंतर त्या कामाची चर्चा झाल्याशिवाय राहत नाही. असेही ते म्हणाले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन दैनिक दिव्य मराठीचे जाहिरात विभागाचे सॅटॅलाइट हेड सुभाष बोंद्रे यांनी केले.

करत असलेल्या कामावर प्रेम केल्यावर कौतुक होते

कोणत्याही क्षेत्रात आपण स्वतः जे काम करतो ते काम मनातून केले.आणि त्या कामावर प्रेम केले तर त्या कामाची दखल घेतल्या जाते. तसेच कोणतेही काम साधे किंवा कमी नसते. त्या कामाला उच्च दर्जा देणारा माणूस जर योग्य असेल तर तो माणूस उंच शिखरावर जाऊन पोहोचतो. असे मत केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांनी या कार्यक्रमा दरम्यान व्यक्त केले.

## पान ६ वरुन...

### विष पाजून ठार केल्या प्रकरणी

जखमी केले. त्यानंतर त्यास तात्काळ बीड जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान त्याचा मृत्यू झाला. या घटनेप्रकरणी मयताची आई सुमनबाई चव्हाण यांनी दत्ता अंकुश राठोड (मेहुणा), अंकुश राठोड (सासरे), विष्णू राठोड ( मेहुणा), मिराबाई राठोड (सासू) आणि शेवंता चव्हाण (पत्नी) यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला होता. गेवराई पोलिसांनी तपास पूर्ण करून न्यायालयात दोषारोपपत्र दाखल केले. सुनावणीदरम्यान सरकारी पक्षाने आरोपींविरुद्ध आरोप सिद्ध करण्याचा प्रयत्न केला. मात्र, बचाव पक्षाचे वकील अँड. तेजस नेहरकर यांनी साक्षीपुरावे व परिस्थितीजन्य बाबींवर आधारित प्रभावी युक्तिवाद मांडला. मयताच्या मृत्यूप्रकरणी आरोपीविरुध ठोस पुरावा नसल्याचे त्यांनी न्यायालयासमोर स्पष्ट केले. दोन्ही बाजूंचा युक्तिवाद ऐकून मा. जिल्हा न्यायालयाने पाच ही आरोपींची दि.२४/४/२०२६ रोजी निर्दोष मुक्तता केली आहे. या प्रकरणात ड. तेजस नेहरकर यांना अँड. गौतम नाईकवाडे अँड. दत्ता केसकर, अँड. रविराज राठोड, ड. सिकंदर यांनी सहकार्य केले.

### ‘वसुंधरा पॅटर्न’चा दमदार डंका

राज्य गुणवत्ता यादीत स्थान मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये श्रेयश बनकर (१६३), संस्कृती शेळके (१६१), ऋतुजा गरसुळे (१५९), जान्हवी भामुद्रे (१५८), समर्थ पोकळे (१५८), श्रावणी गडदे (१५७) यांच्यासह एकूण ४९ विद्यार्थ्यांनी उल्लेखनीय यश मिळवले

शिक्षकांची जिद्द – यशाचा खरा पाया

या यशामागे शाळेतील शिक्षकांची निष्ठा आणि समर्पण ठळकपणे दिसून येते.

पूर्ण वेतन अनुदान नसतानाही अखंड मेहनत

विद्यार्थ्यांच्या तयारीसाठी एकही सुट्टी न घेता मार्गदर्शन

श्रीम. वर्षा कसरे, श्री. सचिन ढकणे, श्री. सचिन काळे व श्री. गणेश हिंगणे यांचे विशेष योगदान

या उल्लेखनीय यशाबद्दल मुख्याध्यापिका सीमा बोंदार्डे, मुख्याध्यापक मंगेश भालेराव, संचालक मनोज धस, प्रफुल्ल सहस्त्रबुद्धे यांच्यासह शिक्षणाधिकारी प्रियाराणी पाटील, मयूरेश मोरे आणि आमदार सुरेश धस यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे अभिनंदन केले आहे. ‘वसुंधरा पॅटर्न’ हा केवळ निकालाचा आकडा नाही, तर तो शिस्त, सातत्य, शिक्षकांची तळमळ आणि विद्यार्थ्यांची मेहनत यांचा संगम आहे. ग्रामीण भागातील शाळाही योग्य नियोजन आणि समर्पणाच्या जोरावर राज्यात अव्वल ठरू शकते, हे वसुंधरा विद्यालयाने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.

### कवडगाव येथे संत भगवानबाबा मूर्ती

आणलेली असून या मंदिरासाठी अंबादास खेडकर यांनी चार गुंठे जमीन दान दिली आहे. तर तीन दिवशीय कार्यक्रमात कुंडलिक घुगे, सर्जेराव सानप यांनी पहिल्या दिवशी अन्नदान केले, दुसऱ्या दिवशी रामदास माने, भारत माने ,महादेव ढाकणे सोमीनाथ ढाकणे , तर तिसऱ्या दिवशी छबुराव घुगे यांनी सकाळी तर माऊली सर्जेराव सांगळे, सोमनाथ सर्जेराव सांगळे यांच्या वतीने शेवटी कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी खेडकर वस्ती व कवडगाव ग्रामस्थांनी परिश्रम घेतले.

### नेकनूर दगडफेक

रिक्षाचा कट लागल्याने एक मोटारसायकलस्वार खाली पडल्याची घटना काल सायंकाळी घडली. या घटनेनंतर रिक्षाचालक आणि मोटारसायकलस्वारामधील वाद येथील बसस्थानकासमोर विकोपाला गेला. काही वेळातच दोन्ही गट समोरा-समोर आल्याने मोठा वाद झाला. सदरील घटनेनंतर दगडफेक आणि मारामाऱ्या झाल्याने गावात काही वेळ तणाव निर्माण झाला होता. या प्रकरणात नेकनूर पोलीस ठाण्याचे पो.कॉ.ालासाहे ढाकणे यांनी दिलेल्या फिर्यादीवरून अदनान खान वाजेद खान, सय्यद सादाद सय्यद नसरत अली, पठाण सैफ लैक, शेख अयान रईस, शेख अमन शेख अखील, शुभम तुकाराम राऊत, आदेश नामदेव काळे, मल्हारी नन्नवरे, अविनाश भारत काळे व त्यांच्यासोबत इतर १५ ते २० अनोळखी इसम यांच्याविरूध्द जिल्हाधिकाऱ्यांच्या जमावबंदी आदेशाचे उल्लंघन करून एकमेकांना जीवे मारण्याच्या उद्देशाने एकमेकांच्या अंगावर दगड फेकून मारणे, चिथावणीखोर वक्तव्य करून एकमेकांना ठार मारण्याची धमकी देऊन शिवीगाळ केल्याप्रकरणी कलम १०९, ३५२, ३५१(२), १८९, १९०, १९१, १९२, २२३ बीएनएस सह कलम १३५ मपोका अधिनियम १९५१ प्रमाणे गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पोउपनि रोकडे करीत आहेत. यासह दोन्ही गटाकडून परस्पर विरोधी तक्रारी दाखल झाल्या असुन पोलीसांनी दोघांच्याही तक्रारी घेत त्यामध्ये गुन्हे दाखल केले आहेत.

## अंबाजोगाईत एस.एफ.आय.कडून जलकुंड स्वच्छता मोहीम राबवली

अंबाजोगाई । प्रतिनिधी

एस.एफ.आय (SFI) अंबाजोगाई तालुका समितीच्या वतीने कवी दासोपंत यांच्या समाधी परिसरातील नरसिंह मंदिराजवळील जलकुंडाची स्वच्छता मोहीम आज उत्साहात राबविण्यात आली.



सदर परिसरात दारुड्यांचा वाढलेला वावर, जलकुंडात विसर्जित केलेल्या मूर्तींचे अवशेष तसेच नगर परिषदेचे झालेल्या दुर्लक्षामुळे परिसर अस्वच्छ झाला होता. यामुळे पर्यटक तसेच महिलांसाठी हा परिसर अयोग्य बनत चालला होता. या पार्श्वभूमीवर एस.एफ.आयने पुढाकार घेत स्वच्छता मोहीम हाती घेतली.या वेळी तालुका समितीने भविष्यातही अशा उपक्रमांद्वारे परिसर स्वच्छ व सुरक्षित ठेवण्यासाठी आवश्यक ती पावले उचलण्याचा निर्धार व्यक्त केला.या मोहिमेत विविध महाविद्यालये व शाळांमधील विद्यार्थी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. तसेच डी.वाय.एफ.आय (DYFI) चे सुहास चंदनशिव, प्रशांत मस्के, अजिंक्य सरवदे आणि अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा कार्याध्यक्ष प्रदीप चव्हाण उपस्थित होते.एस.एफ.आय अंबाजोगाई तालुका अध्यक्ष हमीद रुकसाना मुनवर, सचिव प्रथमेश मीरा जगन्नाथ, उपाध्यक्ष पायल कोळी, स. म. सदस्य तेजस सरवदे तसेच तालुका समिती सदस्य सारंग सुनिता अशोक, विशाल राठोड, प्रमोद नागरगोजे, सुरज व्हावळे, कावेरी मुंडे, गीता घुमरे, उमंग बुरांडे, हर्षा चव्हाण, कृष्णा मस्के, संध्या चौधरी, प्रज्ञा खोसे, आसाराम सानप, आविष्कार गीता बळीराम, मंगेश नागरगोजे व इतर कार्यकर्ते या वेळी उपस्थित होते.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी संविधानाच्या माध्यमातून सामान्यांना समतेचा अधिकार दिला -प्रदीप मुंडे

परळी । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील दौनापूर येथे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त येथील जयंती उत्सव समितीने उत्साहपूर्ण वातावरणात विविध कार्यक्रमांचे आयोजन डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या १३५ व्या जयंतीनिमित्त करण्यात आले. यावेळी नागापूर जिल्हा परिषदेचे सदस्य श्री.प्रदीप भैय्या मुंडे (बबलू शेठ) यांच्या हस्ते निळया ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.

सर्वप्रथम महामानव भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन करण्यात आले.कार्यक्रमादरम्यान बोलताना प्रदीप भैय्या मुंडे म्हणाले की, डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी भारतीय संविधानाच्या माध्यमातून सर्वसामान्यांना समतेचा, न्यायाचा



आणि स्वातंत्र्याचा अधिकार मिळवून दिला. त्यांच्या विचारांचा वारसा पुढे नेणे हीच त्यांना खरी अभिवादन ठरेल, असेही त्यांनी नमूद केले.या प्रसंगी गावातील मान्यवरांनी आधारित भाषणे, प्रबोधनपर विचार आणि घोषणांनी परिसर दुमदुमून गेला. यावेळी जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष माणिक घाडगे, छगन घाडगे प्रमुख पाहुणे म्हणून महादेव मुळे, माजी सरपंच बळीराम आघाव, शहाणिक तात्या कराड, राम किसन घाडगे, भानुदास आघाव, महादेव सोमोसे, श्रीमंत राख, युवराज नानवटे , ग्रामपंचायत सदस्य अंकुश राख, कल्याण नानवटे, गोविंदा आघाव, बाळा गायके, अशोक आघाव, मुंजा कराड, धनंजय घाडगे, चंद्रमणी घाडगे, मुन्ना घाडगे, विष्णू वाघ, अरुण आघाव, हरिभाऊ घाडगे, करण गायकवाड, नितीन सावंत, शेख आयुब आदीसह बौद्ध उपासक उपासिका आणि गावातील नागरिक महिला युवक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुप यांनी लोकसहभागातून वृक्षवल्ली रोपटे जपण्याची हाती घेतली मोहीम

पाथर्डी प्रतिनिधी

पाथर्डी शहरालगत वन विभागाच्या जागेत उभारलेला ऑक्सिजन पार्क पाण्याअभावी ऑक्सिजनवर ठेवण्याची वेळ आल्या चे पाहून वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुपच्या सदस्यांनी एकत्र येत लोकसहभागातून या सर्व बाल्यावस्थेतील रोपे व झुडपांना पाणी देण्याचा उपक्रम सुरू केला या उपक्रमाचे निसर्गप्रेमींनी जोरदार स्वागत करत सहभाग नोंदविण्याची तयारी दर्शविली आहे शहरापासून अवघ्या दीड किलोमीटर अंतरावर धामणगाव रस्त्यालगत शेकडो एकर डोंगरदऱ्याचा वनविभागाचा परिसर आहे गेल्या दहा-बारा वर्षांपूर्वी येथे वन विभागाने निसर्ग परिचय केंद्राची स्थापना करत बालोद्यान उभारले व परिसराचा काही प्रमाणात विकास सुरू केला शहरातील हजारो स्त्री-पुरुष व सर्व थरातील नागरिक, ज्येष्ठ नागरिक सकाळ सायंकाळी येथे फिरण्यासाठी येतात अत्यंत शांत रमणीय प्रदूषण विरहित परिसर शहरालगत जिल्ह्यात अन्यत्र कोठेही नाही येथील डोंगरदऱ्याची व खडकांची रचना अशी आहे की येथे देशी झाडांशिवाय अन्य झाडे जगत नाहीत खडकाळ मुरमाड डोंगर असल्याने या परिसरात माती अत्यंत कमी आह तरीही वनविभागाने पुढाकार घेत निसर्ग परिचय केंद्र तयार करत येथे बालोद्यान स्थापन केले सेल्फी पॉईंट तयार केले वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुपच्या सदस्यांनी आमदार मोनिका राजळे यांच्याकडे वनक्षेत्र विकास निसर्ग पर्यटन अथवा अन्य कोणत्याही योजनेतून शासनाकडून निधी मिळवून देण्याची मागणी केली त्यानुसार आमदार मोनिका राजळे यांनी सुमारे सव्वा



दोन कोटी रुपये पहिला टप्प्यासाठी गेल्या दोन वर्षांपूर्वी उपलब्ध करून दिल त्या निधीतून पाण्याची टाकी प्रगतीपथावरील सध्याचे रस्ते नवीन झाडांचे रोपण निसर्ग टेहळणी टॉवर, जॉगिंग ट्रॅक बालोद्यान सुधारणा अशी विविध कामे केली. बालोद्यानाच्या बाजूला लँडस्केपिंग करण्यात आले यापुढे वड पिंपळ औदुंबर लिंब तुळस निलगिरी अशोका, शतावरी, बेल अशा विविध झाडांचे मिळून ऑक्सीजन पार्क सुरू केले संकल्पना अतिशय उत्तम असली तरी निधीची कमतरता व भौगोलिक परिस्थितीचा विचार करता योगायोगाने जिवंत राहिलेल्या झाडाझुडपांना पाण्याचा खर्च करण्यासाठी निधीची टंचाई भासू लागली.ल या भागात गेल्या सुमारे पंधरा वर्षांपासून वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुप चे सदस्य पहाटे फिरण्यासाठी येतात. संपूर्ण परिसरामध्ये पायी फिरत औषधी रोपांची निगा राखतात सुवर्णयुग गणेश मंडळातर्फे लोकसहभागातून पशुपक्षी व वन्यजीवांसाठी येथे पाणवठे उभारण्यात आले आहेत वर्षभर या पाणवट्यांमध्ये पाणी टँकरद्वारे भरले जाते. या कामातही वनदेव मॉर्निंग वॉक ग्रुपचे सदस्यांचा सहभाग आहे पूर्वी गुन्हेगारी व व्यसनी लोकांचा परिसर म्हणून या भागात कुणी सहसा फिरत नव्हते येथे निर्जन व निवांत स्थानी डोंगराच्या मध्यभागी वनेश्वर महादेव मंदिर आहे निसर्गमित्र डॉ.दीपक देशमुख डॉ शिरीष जोशी डॉ विनय कुचेरिया भाऊसाहेब लांडे यांचाही वृक्षसंगोपन कामामध्ये सहभाग राहिला आहे अविनाश मंत्री राजेंद्र एडके सुनील उगले योगेश घोडके शमाली पठाण शशिकांत गायकवाड विनोद पटेल संजय डोईफोडे जालिंदर शिरसाठ यासह वनविभागाचे बबनराव मंचरे भगवान काकडे व सतीश काकडे इतर सदस्यांनी रविवारी सकाळी दोन तास वेळ देत पानगळ झालेल्या भागाचा पालापाचोळा स्वच्छ करत टँकर भर पाणी मागवले पाईप पाण्याच्या रिकामे बाटल्या बादल्या याद्वारे झाडांना सर्वांनी मिळून पाणी दिले पाण्याचा स्पर्श होताच सुकत चाललेली रोपे अवघ्या दहा-पंधरा मिनिटात ताजी तवानी दिसू लागली आगामी काळात निसर्गाशी एकरूपता ठेवून त्याचे संवर्धन करून वाटचाल केली तरच निसर्ग आपले रक्षण करणार आहे येणारा काळ अत्यंत संकटांचा व नैसर्गिक आपत्तींचा आहे असे अभ्यासक सांगतात दिवसेंदिवस पाण्याची परिस्थिती बिकट होत जाणार आहे वृक्षतोड थांबली पाहिजे वृक्षसंवर्धन वाढले पाहिजे यासाठी केवळ शासनाच्या योजनांची वाट न बघता प्रत्येक सुजाण नागरिकाने या कार्यात सहभाग नोंदवावा'' असे आवाहन अविनाश मंत्री यांनी केले आहे.

# पाटोद्यात इंधनाचा खडखडाट: शेतकरी हवालदिल

## सर्वसामान्यांचे हाल ; भाववाढीच्या चर्चेमुळे साठेबाजीची शक्यता ?

पाटोदा । प्रतिनिधी

मागील काही दिवसांपासून पाटोदा शहरासह तालुक्यात पेट्रोल आणि डिझेलचा मोठा तुटवडा निर्माण झाला आहे. शहरातील अनेक पेट्रोल पंप 'नो स्टॉक'चे फलक लावून बंद आहेत, तर जे चालू आहेत तिथे इंधनासाठी नागरिकांच्या लांबच लांब रांगा पाहायला मिळत आहेत. सध्या शेतकऱ्यांच्या नांगरोटीचे आणि मशागतीचे दिवस असतानाच डिझेल मिळत नसल्याने शेतीची कामे ठप्प होण्याची भीती निर्माण झाली आहे.

शेतकऱ्यांवर दुहेरी संकट

सध्या पाटोदा परिसरात शेतकऱ्यांची नांगरोटीची कामे वेगाने सुरू आहेत. ट्रॅक्टर आणि इतर शेती यंत्रांसाठी मोठ्या प्रमाणात डिझेलची गरज असते. मात्र, पंपांवर डिझेल उपलब्ध नसल्याने किंवा २००० रुपयांच्या मर्यादेतच दिले जात असल्याने शेतकऱ्यांना शेतात काम अर्धवट सोडून पंपावर चकरा माराव्या लागत आहेत. अनेक शेतकऱ्यांनी संताप व्यक्त केला आहे की, वेळेवर पाऊस आणि मशागत व्हायला हवी, पण आता डिझेलसाठीच दिवस वाया जात आहे.

पंपांवर इंधनाचे रेशनिंग?

शहरातील परिस्थिती अत्यंत बिकट असून, काही पंपांवर इंधनाचे रेशनिंग सुरू करण्यात आले आहे. दुचाकीस्वारांना केवळ १०० रुपयांचे पेट्रोल दिले जात आहे, तर चारचाकी आणि ट्रॅक्टरसाठी




देखील ठराविक मर्यादा लावण्यात आली आहे. यामुळे लांबच्या प्रवासाला जाणाऱ्या प्रवाशांचे आणि मालवाहतूकदारांचे मोठे हाल होत आहेत. गॅस टंचाईने आधीच हैराण केले होते, आता पेट्रोल पंपांनी देखील सामान्यांना वेठीस धरले आहे, अशी भावना नागरिकांमधून व्यक्त होत आहे.

टंचाई की कृत्रिम टंचाई?

इंधनाचा हा तुटवडा खरा आहे की आगामी काळात होणाऱ्या संभाव्य भाववाढीसाठी ही साठेबाजी केली जात आहे, असा सवाल आता नागरिक विचारत आहेत. काही दिवसांपूर्वीच पाटोद्यात गॅस सिलिंडरचा काळाबाजार उघड झाला होता, त्यामुळे आता पेट्रोल पंपांबाबतही तशीच शंका व्यक्त केली जात आहे. केंद्र आणि राज्य सरकारने इंधनाचा पुरेसा साठा असल्याचे वारंवार सांगितले असले, तरी प्रत्यक्षात पाटोद्यातील पंपांवर 'तेल संपले' आहे हे धक्कादायक वास्तव आहे.

प्रशासनाकडून हस्तक्षेपाची मागणी

इंधनाच्या या गोंधळामुळे शहरात वाहतुकीची कोंडी होत असून नागरिकांमध्ये संतापाचे वातावरण आहे. जिल्हा प्रशासनाने तात्काळ लक्ष घालून पाटोद्यातील पेट्रोल पंपांची तपासणी करावी आणि इंधन पुरवठा सुरळीत करावा, अशी मागणी जनतेकडून होत आहे. विशेषतः शेतकऱ्यांना नांगरोटीसाठी प्राधान्याने डिझेल उपलब्ध करून देण्याची विनंती करण्यात आली आहे.

# नेकनूर दगडफेक : ३० जणांवर गुन्हे दाखल







## रविवारचा आठवडी बाजार भरलाच नाही

नेकनूर । प्रतिनिधी

रिक्षाने कट मारल्याच्या कारणावरून मोटारसायकल -स्वार आणि रिक्षा चालकामध्ये झालेल्या वादानंतर दोन गट समोरा-समोर भिडल्याने नेकनूर (ता.बीड) येथे काल रात्री तणावाची परिस्थिती निर्माण झाली होती. दोन्ही गटाने समोरा-समोर येत एकमेकांवर दगडफेक करत मारामाऱ्या केल्याच्या घटनेनंतर पोलीसांनी तातडीने हस्तक्षेप करत जमावाला पांगवले. या प्रकरणाचे पडसाद उमटू नयेत म्हणून रात्रीतून पोलीस प्रशासनाने अतिरीक्त पोलीस बंदोबस्त मागवून परिस्थिती नियंत्रणात आणली. या प्रकरणात एकूण ३ गुन्हे दाखल झाले असून पोलीस प्रशासनाने स्वत: फिर्यादी होत दगडफेकीसह चिथावणीखोर वक्तव्य करून एकमेकांना ठार मारण्याच्या धमक्या दिल्याप्रकरणी दोन्ही गटात ३० ते ३२ जणांविरूध्द गुन्हे दाखल केले आहे तर अन्य दोन परस्पर विरोधी दाखल झाले आहेत. दरम्यान आजच्या आठवडी बाजारावर या घटनेचा

परिणाम दिसुन आला. तुरळक ठिकाणी पोलीस बंदोबस्तात काही दुकाने लावण्यात आली होती. सध्या तणावपुर्ण शांतता असून पोलीसांनी या प्रकरणात ११ जणांना ताब्यात घेतल्याचे सुत्रांनी सांगितले. बीड तालुक्यातील नेकनूर येथे ◀◀ पान ३ वर

# ट्रॅव्हल्स पल्टी, चिमुकलीचा दुर्दैवी मृत्यू

आष्टी । प्रतिनिधी

पुण्यावरून बीडकडे निघालेल्या ट्रॅव्हल्स चालकाला पहाटेच्या दरम्यान डुलकी लागल्याने अचानक स्टेअरिंग वरील नियंत्रण सुटल्याने टेम्पो ट्रॅव्हल्स पलटी झाली.यात खिडकीच्या बाहेर फेकल्या गेलेल्या आठ वर्षीय चिमुकलीचा जागीच मृत्यू झाला.तर कुटुंब दहा ते पंधरा सदस्य किरकोळ जखमी झाल्याची घटना खडकत माहिजळगांव रोडवर रविवारी पहाटे साडेपाचच्या दरम्यान घडली.जखमीवर जामखेड येथील रूग्णालयात उपचार सुरू आहेत.तर चिमुकलीचा मृतदेह जामखेड येथील सरकारी रूग्णालयात शवविच्छेदनासाठी ठेवण्यात आला आहे.



पुण्यावरून बीडला धार्मिक कार्यक्रमासाठी खाजगी टेम्पो ट्रॅव्हल्स घेऊन जात असताना खडकत माहिजळगांव रोडवर पहाटे चालकाला अचानक डुलकी लागल्याने स्टेअरिंग वरील नियंत्रण सुटून ट्रॅव्हल्स पलटी झाल्याने झालेल्या अपघातात यशश्री विजय सोनवणे वय वर्ष ८ रा.भोसरी पुणे या चिमुकलीचा मृत्यू झाला असून १२ ते १५ जण किरकोळ जखमी झाले आहेत.ही घटना रविवारी पहाटे सिना नदीवरी पुलाजवळ खडकत रोडवर पहाटे साडेपाचच्या दरम्यान घडली.

# विष पाजून ठार केल्या प्रकरणी पाच आरोपींची निर्दोष मुक्तता-अॅड.तेजस नेहरकर

बीड । प्रतिनिधी

सासरवाडीच्या लोकांना दिलेले पैसे परत मागण्यासाठी गेलेल्या जावयास पाच जणांनी मिळून मारहाण करून ठार केले होते. या प्रकरणात आरोपीच्या वतीने अॅड. तेजस नेहरकर यांनी मांडलेला बचाव व केलेला भारी भक्कम युक्तिवाद ग्राह्य धरून मा. जिल्हा न्यायालयाने पाच ही आरोपींची निर्दोष मुक्तता केली आहे.



प्रकरणाची अधिक माहिती अशी की, मयत मिथुन चव्हाण यांनी पंढरपूर येथील पडळ साखर कारखान्यासोबत ऊसतोडीचा करार केला होता. यासाठी त्यांनी टोळी उभी करण्यासाठी आपले मेहुणे दत्ता राठोड आणि सासरे अंकुश राठोड (रा. खांडवी) यांना ४ लाख ५० हजार रुपये उचल म्हणून दिले. मात्र त्यांनी ऊसतोडीला जाण्यास नकार दिला. त्या नंतर मिथुन यांनी पैसे परत मागितल्यावर सासरच्या मंडळींनी नकार देत त्यांना मारहाण केली. त्या नंतर पुन्हा दि. ७ नोव्हेंबर २०२५ रोजी मिथुन हे पैसे मागण्यासाठी खांडवी येथे गेले असता दुपारी २ ते ४ वाजण्याच्या सुमारास तेथे पुन्हा वाद झाला. यावेळी मिथुन यास सर्व आरोपींनी मिळून विष पाजून मारहाण करून ◀◀ पान ३ वर





बीड : बीडच्या गटशिक्षणाधिकारीपदी भगवानराव सोनवणे तर वडवणीच्या गटशिक्षणाधिकारीपदी राहुल भट्टी यांची नियुक्ती झाल्यानंतर दै.राज्य लोकतंत्र व मित्रपरिवाराच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी दै.लोकतंत्रचे कार्यकारी संपादक सुभाष चौरे, मराठी पत्रकार परिषदेचे जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, उपसंपादक अनिल जाधव, जाहिरात प्रमुख दिलीप शिंगाडे, संगणक चालक नागेश क्षीरसागर, मुख्याध्यापक राजेंद्र वाघमारे, शिक्षक रोडे, निबंधक कार्यालयाचे प्रशांत देशमुख, सुनिल फटाले, रेणुकादास पांडव आदी.

# 'वसुंधरा पॅटर्न'चा दमदार डंका; एनएमएमएस शिष्यवृत्ती परीक्षेत ७५ पैकी ७५ विद्यार्थी उत्तीर्ण!

आष्टी । प्रतिनिधी

शिक्षण क्षेत्रात सातत्य, गुणवत्ता आणि जिद्दीचा संगम काय असतो, याचे जिवंत उदाहरण म्हणजे वसुंधरा प्राथमिक विद्यालय, आष्टी. नुकत्याच जाहीर झालेल्या 'राष्ट्रीय आर्थिक दुर्बल घटक विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना (छचचड)' (डिसेंबर २०२५) निकालात शाळेने अक्षरशः इतिहास घडवला आहे.

७५ पैकी ७५ विद्यार्थी उत्तीर्ण होत १०० टक्के निकालाची अभूतपूर्व कामगिरी शाळेने




नोंदवली. याहूनही मोठी बाब म्हणजे, राज्य गुणवत्ता यादीत तब्बल ४९ विद्यार्थ्यांनी स्थान पटकावले, तर बीड जिल्ह्यातील पहिल्या १० पैकी ८ विद्यार्थी एकट्या वसुंधरा विद्यालयाचे आहेत. त्यामुळे 'वसुंधरा पॅटर्न'चा यशस्वी डंका संपूर्ण जिल्ह्यात घुमत आहे .सातत्यपूर्ण यशाची भक्कम परंपरा

वसुंधरा प्रशालेने केवळ एकदाच नव्हे, तर अनेक वर्षे शिष्यवृत्ती परीक्षेत आपली गुणवत्ता सिद्ध केली आहे.

२०१७ ते २०२४ या कालावधीत तब्बल ३७५ विद्यार्थी शिष्यवृत्तीधारक

प्रत्येक विद्यार्थ्याला ४८,००० प्रमाणे एकूण सुमारे १.८० कोटी निधी चालू वर्षी (२०२५-२६) ७५ विद्यार्थ्यांना मिळणार ३६ लाखांचा निधी ही आकडेवारीच शाळेच्या शैक्षणिक ताकदीचा पुरावा देणारी आहे. गुणवत्ता यादीत झळकलेले मानकरी

◀◀ पान ३ वर

# जिल्हा परिषदेच्या जागेवर अतिक्रमण

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्हा परिषदेच्या विविध मोक्याच्या जागेवर बेकायदेशीर कब्जा करून अतिक्रमण करण्यात आले आहे. जिल्हा परिषदेच्या शाळा आणि प्राथमिक आरोग्य केंद्राच्या जाग्यावर अतिक्रमण करण्यात आलेले आहेत. ऐन जिल्हा परिषदेच्या मुख्यालयाच्या बीड येथील मुख्य जागेवर जिल्हा परिषद प्रशासनाच्या नाकावर टिच्चून अनेक वर्षापासून अतिक्रमण करण्यात आलेले आहे. जिल्हा परिषदेच्या काही अधिकाऱ्यांनी लाभापोटी





मिलीभगत करून अतिक्रमण झाल्याचा आरोप करण्यात आला आहे. याप्रकरणी दखल घेऊन जिल्ह्यातील जिल्हा परिषदेच्या जागेवरील बेकायदेशीर कब्जा करून केलेली अतिक्रमण काढण्यात यावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

जिल्हा परिषदेच्या दारातच अतिक्रमण

युतीचे शासन असताना झुणका- भाकर केंद्रासाठी शासनाच्या मोक्याच्या जागा शासनाच्या वतीने देण्यात आल्या होत्या. मात्र शासनाने झुणका भाकर केंद्र बंद केली. न्यायप्रविष्ट झुणका- भाकर केंद्राच्या नावाखाली अनेकांनी या जागा बळकावण्याचा प्रयत्न आहे. प्रशासनाने कारवाई करून अतिक्रमण काढावीत, अशी मागणी करण्यात आली आहे.

# कवडगाव येथे संत भगवानबाबा मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा उत्साहात

## प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळ्यानिमित्त तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील कवडगाव येथील खेडकर वस्ती येथे आदर्श समाज सुधारक ऐश्वर्यसंपन्न राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या मुर्तीची प्राणप्रतिष्ठा व कलशारोहण सोहळा श्री क्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत दत्ता महाराज गिरी यांच्या शुभहस्ते व ब्रम्हवृदांच्या मंत्रघोषात उत्साहात संपन्न झाला. यानिमित्त मंदिरात तीन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न होवून मूर्ती प्राणप्रतिष्ठा सोहळा भक्तीमय वातावरणात पार पडला.

दरम्यान यावेळी श्रीक्षेत्र गोरक्षनाथ संस्थानचे महंत ह.भ.प.दत्ता महाराज गिरी यांची किर्तन सेवा झाली. यावेळी भाजपचे गेवराई तालुका समन्वयक श्रीकांत सानप, पत्रकार विनोद पौळ, ह.भ.प.तुकाराम महाराज गिरी, अंकुश खरात, संतोष थोरात, तुकाराम तळतकर, श्रीधर पौळ, विजय राठोड, दिलीप चौधरी, चंद्रकांत भोसले, महादेव बिचकुले, प्रकाश खरात, नारायण गोल्हार, सुधाकर सानप, एकनाथ मोंढे, डॉ.तांदळे, माऊली महाराज, लक्ष्मण समगे, पांडुरंग खेडकर सह



महिला व पुरुष भाविकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

दरम्यान यावेळी राष्ट्रसंत भगवान बाबा यांच्या मुर्तीची गावातून संवाद्य टाळ मृदंगाच्या गजरात मिरवणूक काढण्यात आली. महिलांनी घराबाहेर सडा रांगोळी काढून या मिरवणुकीचे ठिकठिकाणी स्वागत केले. या मिरवणुकीत बालगोपाळांसह वारकरी, टाळकरी, महिला, पुरुष मंडळींनी मोठ्या उत्साहाने सहभागी होवून जय हरी विठ्ठल व भगवानबाबांचा जयघोष केला.यामुळे परिसर दणाणून गेला होता. महंत दत्ता महाराज गिरी यांच्या शुभहस्ते व वेदमुर्ती अशोक देवा मुळे यांच्यासह ब्रम्हवृदांच्या मंत्रोच्चारामध्ये कवडगावसह खेडकर वस्ती येथील विवाहित जोडप्यांच्या उपस्थितीत या मूर्तीची प्राणप्रतिष्ठा करण्यात आली. ही आकर्षक मुर्ती नाशिक येथून

◀◀ पान ३ वर

# गेवराई जवळील दुचाकी अपघातात दोन तरुण ठार

गेवराई । प्रतिनिधी

बीडकडून दुचाकीवरुन गावाकडे परतत असताना आज्ञात वाहनाने दुचाकीला धडक दिल्याने दोन तरुण जागीच ठार झाल्याची घटना शनिवारी दि.२५ धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील गेवराई तालुक्यातील पाडळसिंगी उड्डाण पूलाजववळ घडली. अभिजीत सुभाष राठोड (वय २३)व अभिजीत एकनाथ पवार ( वय २३)रा. जातेगाव (गावखोर तांडा) ता.गेवराई जि बीड असे या आपघातात झालेल्या तरुणाचे नावे आहेत. शनिवारी कपडे खरेदी करण्यास बीडला गेले होते.खरेदी झाल्यानंतर ही दोन्ही तरुण रात्री उशिरा गाव जातेगाव कडे परत असताना साधारण साडेआठ वाजेच्या सुमारास धुळे-सोलापूर राष्ट्रीय महामार्गावरील पाडळसिंगी उड्डाण पूलाजववळ आज्ञात वाहनाने धडक दिल्याने अभिजीत पवार व अभिजीत राठोड या दोघांचा जागीच मृत्यू झाला.या आपघाताची वाहतूक पोलीसांना मिळताच दोन्ही मृत तरुण यांचे मृतदेह उत्तरीय तपासणीस बीड जिल्हा रुग्णालयात दाखल करण्यात आले.रविवारी उत्तरीय तपासणीनंतर अभिजीत पवार आणि अभिजीत राठोड या दोघांवर गाव जातेगाव येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.झालेल्या दुर्घटनेमुळे गावात हळहळ व्यक्त करण्यात येत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# अजितदादांच्या प्रतिमेला दिवाबत्ती करायला गेले; समोर काय काय दिसलं? अमोल मिटकरींचा हादरवणारा दावा

पुणे । प्रतिनिधी

माजी उपमुख्यमंत्री अजित पवार यांचा २८ जानेवारी २०२६ रोजी बारामती येथे विमान अपघातात (- क्षळीं झरुरी झश्ररपश उीरिह) दुर्दैवी मृत्यू झाला. मुंबईहून बारामतीकडे जात असताना त्यांचे लिअरजेट विमान कमी दृश्यमानता आणि धुक्यामुळे नियंत्रणाबाहेर जाऊन कोसळले, ज्यात अजित पवारांसह एकूण पाच जणांचा मृत्यू झाला.




सध्या अजित पवारांच्या विमान अपघाताची चौकशी सुरू असून अनेक प्रश्न उपस्थित झाले आहेत. काही नेत्यांनी या प्रकरणाची सखोल व निष्पक्ष चौकशी करण्याची मागणी केली आहे. तर या अपघातानंतर राजकीय वर्तुळात अनेक तर्कवितर्क लावले जात असतानाच, आता या प्रकरणाशी 'काळी जादू' आणि 'अघोरी पूजा' यांचा संबंध असल्याचा खळबळजनक आरोपही वारंवार करण्यात येत आहे. याचदरम्यान आता अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी एक्सवर पोस्ट करत धक्कादायक माहिती दिली आहे. अजितदादांच्या प्रतिमेला काही लोक दिवा बत्ती करण्यासाठी गेले असता, त्यांना गोजुबावी या ठिकाणी पूजेच्या ताटात २ लिंब टाचण्या टोचून ठेवलेल्या स्थितीत आढळल्या, हे कुणी जाणीवपूर्वक करतेय की अघोरी पुजा प्रकार?, असा सवाल अमोल मिटकरी यांनी उपस्थित केला आहे. अजित पवार यांच्या अपघाताच्या एक दिवस आधी बारामतीतील विद्या प्रतिष्ठानच्या बांधकाम साइटवर 'अघोरी पूजा' करण्यात आली होती, असा दावा अजित पवार गटाचे नेते अमोल मिटकरी यांनी केला आहे. या संपूर्ण घटनेमागे काहीतरी अघोरी प्रकार किंवा कट असल्याचा संशय शरद पवार गटाचे आमदार रोहित पवार यांनी व्यक्त केला असून, या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी अशी मागणीही त्यांनी केली आहे. अजित पवार यांचे विमानात बसण्यापूर्वीचे सीसीटीव्ही अद्याप बाहेर का आले नाहीत. तुम्ही म्हणाला १५ दिवसांत ब्लैक बॉक्स डेटा बाहेर आणू, मग ४ महिने झाले का डेटा बाहेर आला नाही. अशोक खरातचे सीसीटीव्ही गतीने बाहेर येतात, परतवाडा प्रकरणातील सीसीटीव्ही बाहेर येतात मग अजित पवार अपघाताचे का नाहीत?, बारामती विमान दुर्घटनेचा ब्लॅकबॉक्स अद्याप बारामती पोलीस ठाण्यात आहे. बारामतीत मी मागील ३ दिवस फिरत आहे. बारामतीचे लोक आम्हाला सांगत आहेत, असं अमोल मिटकरी म्हणाले.

# लग्नाच्या वरातीत नाचण्यावरुन वाद, राग मनात धरुन भावानेच काढला भावाचा काटा

पुणे । प्रतिनिधी

लग्नाच्या वरातीत नाचण्यावरुन झालेल्या भांडणाचा बदला घेण्यासाठी राग मनात धरून भावानेच आपल्या भावाला संपवल्याची धक्कादायक घटना पुण्यात घडली (झींपश उीळाश ) आहे. धारदार शस्त्राने हत्या केली आहे. भावाच्या लग्नातील वरातीत नाचण्यावरुन दोन भावांची भांडण झाली होती. याचा राग मनात धरुन भावाला संपवलं आहे. तेजस पिलाने (ढशक्षरी झळश्रश्ररपश) असे हत्या करण्यात आलेल्या २४ वर्षे तरुणाचं नाव आहे. नावभारती विद्यापीठ पोलिसांनी पाठलाग करुन चार जणांना बेड्या ठोकल्या आहेत. दरम्यान, या घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

या प्रकरणी पोलिसांनी विशाल खोपडे (२२), अभिषेक खोपडे (२३), हरिश्चंद्र धुळे (४३), आदिनाथ कसबे (१९) अशा चारही आरोपींना अटक केली आहे. २५ एप्रिलला कात्रज सर्व्हिस रोडवर तेजस पिलाने हा बेशुद्ध अवस्थेत आढळून आला होता. त्याच्यावर धारदार शस्त्रने वार करण्यात आल्याचं पोलिसांच्या लक्षात आलं आणि त्यानंतर पोलिसांनी भारतीय विद्यापीठ रुग्णालयात उपचारासाठी दाखल केला उपचारादरम्यान तेजसचा मृत्यू झाला. तेजसच्या भावाने पोलिसात तक्रार दाखल केली आणि याचा छडा लावण्यासाठी पोलिसांनी थेट वेल्हा जवळील कोंढवाळे गाव गाठलं आणि त्यात तेजसची आणि आरोपी असलेल्या विशाल



खोपडे याची दोघांच्याही भावाच्या लग्नात नाचण्यावरून भांडण झाल्याचं पोलिसांच्या तपासात समोर आलं. त्यानंतर पोलिसांनी तपास केला आणि २२ वर्षाच्या तरुणासह अजून तीन जणांना अटक केली आहे. विशाल खोपडे (२२), अभिषेक खोपडे (२३), हरिश्चंद्र धुळे (४३), आदिनाथ कसबे (१९) अशी चारही आरोपींची नावं आहेत. या सगळ्यांनी मिळून लग्नाच्या वरातीत नाचण्यावरून झालेल्या वादाचा राग तेजस पिलानेवर काढला आणि त्याची धारदार शस्त्राने वार करून हत्या केली.

# सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात करार प्राध्यापकांच्या मानधनात वाढ

पुणे । प्रतिनिधी

विद्यापीठ आवारातील शैक्षणिक विभागात करार पद्धतीने नियुक्त करण्यात येणाऱ्या प्राध्यापकांचे मानधन वाढवून ४० हजारांवरून थेट ५० हजार करण्यात येणार आहे. यामुळे गुणवत्तापूर्ण अध्यापनाला चालना मिळणार असल्याचे स्पष्ट झाले आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेची बैठक शनिवारी (दि. २५) पार पडली.



या सभेत विद्यार्थी कल्याण, शैक्षणिक गुणवत्ता आणि सामाजिक बांधिलकी विचारात घेऊन अनेक महत्त्वाचे निर्णय घेण्यात आले. 'कमवा व शिका' योजनेअंतर्गत काम करणाऱ्या विद्यार्थ्यांच्या मानधनात प्रतितास रु. ५५ वरून रु. ६५ अशी वाढ करण्यात आली आहे. या निर्णयामुळे विद्यापीठावर सुमारे एक कोटी रुपयांचा अतिरिक्त आर्थिक भार पडणार आहे. विद्यार्थी अपघात सुरक्षा विमा योजनेचा करार करण्यास मान्यता देण्यात आली. यासाठी ४० लाखांच्या निधीची तरतूद केली. तसेच, विविध परीक्षांच्या आयोजनादरम्यान विद्यार्थ्यांना भेडसावणाऱ्या समस्यांवर कायमस्वरूपी उपाययोजना सुचवण्यासाठी प्राचार्य नितीन घोरपडे यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे.विद्यापीठाच्या आरोग्य केंद्रातील सुविधा अधिक सक्षम करण्यासाठी रुबी हॉल क्लिनीकबरोबर करार करण्यात येणार असून, त्याद्वारे विद्यार्थ्यांना विविध वैद्यकीय सुविधा व आपत्कालीन सुविधा उपलब्ध होणार आहेत. अहिल्यानगर उपकेंद्राच्या सक्षमीकरणासाठी शैक्षणिक समन्वयकाची नियुक्ती करण्यास मान्यता देण्यात आली. तसेच छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याचे दर्शनी भागातून प्रभावी दर्शन व्हावे, यासाठी परिसर सुशोभीकरण आणि आवश्यक उपाययोजना करण्यासाठी डॉ. राजेंद्र विखे पाटील यांच्या अध्यक्षतेखाली समिती स्थापन करण्यात आली आहे. भारतीय शास्त्रीय नृत्य संवर्धन संस्थेच्या सीएसआर उपक्रमांतर्गत विद्यापीठात ३ एकर जागेवर जागतिक दर्जाचे नृत्य संकुल उभारण्यासाठी तत्त्वत: मान्यता देण्यात आली

# गोबर गॅस टाकीत गुदमरून तिघांचा मृत्यू



पुरंदर । प्रतिनिधी

पुरंदर तालुक्यातील बेलसर नजीक चोपण वस्ती परिसरातील एका मशरूम कंपनीत आज (रविवार) हृदयद्रावक घटना घडली. गोबर गॅस टाकीची साफसफाई करताना विषारी वायूचा फटका बसून तिघांचा दुर्दैवी मृत्यू झाला. या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. प्राथमिक माहितीनुसार, कंपनी परिसरातील सुमारे ५ बाय ५ फूट आकाराच्या गोबर गॅस टाकीची साफसफाई सुरू होती. यावेळी एक कामगार टाकीत उतरला. मात्र टाकीमध्ये साचलेल्या विषारी वायूमुळे काही क्षणांतच त्याचा श्वास गुदमरू लागला. त्याला वाचवण्यासाठी दुसरा कामगार तत्काळ टाकीत उतरला, पण दुर्दैवाने त्याचाही श्वास गुदमरला.

दोघांना बाहेर काढण्यासाठी ठेकेदार स्वतः टाकीत उतरला. मात्र टाकीतील घातक वायूचा फटका त्यालाही बसला आणि काही क्षणांतच तिघेही बेशुद्ध पडले.

# करंदीत बिबट्या दिसताच वाजणार सायरन; शिरूर वनविभागाकडून 'बेस अलार्म सिस्टम' कार्यान्वित

शिक्रापूर । प्रतिनिधी

शिरूर तालुक्यातील करंदी येथे बिबट्याचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण होते. या पार्श्वभूमीवर ग्रामस्थ व पोलिस पाटील वंदना साबळे यांनी केलेल्या पाठपुराव्याला यश आले असून, वनविभागाने गावात कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित ''बेस अलार्म सिस्टम'' बसवली आहे. आता परिसरात बिबट्या दिसताच सायरन वाजणार असून, ग्रामस्थांना तातडीने सावध होता येणार आहे.

करंदी परिसरात गेल्या काही दिवसांपासून वारंवार बिबट्याचे दर्शन होत होते. बिबट्याने अनेकदा पशुधनावर हल्ले केले, तर काही ठिकाणी घरासमोर आणि गोठ्यांजवळ बिबट्या वावरत असल्याचे सीसीटीव्हीमध्ये कैद झाले होते.



यामुळे शेतकरी, मजूर आणि शाळकरी मुलांच्या सुरक्षेचा प्रश्न गंभीर बनला होता. वनविभागाकडे ही यंत्रणा बसवण्याची मागणी केली होती. दरम्यान, वरिष्ठ कार्यालयाकडून निधी मंजूर होताच, धामारी रोड परिसरात ही यंत्रणा बसवण्यात आली. नुकतीच या सिस्टमची अधिकृत चाचणी घेण्यात आली. यावेळी नियतक्षेत्र वनअधिकारी सोपान अनासुने, पोलिस पाटील वंदना साबळे, आपदा मित्र महेश साबळे पाटील, राहुल ढोकले, वन्यजीव बचाव पथकाचे गणेश टिळेकर, शुभांगी टिळेकर, अमोल कुसाळकर आणि राहुल गायकवाड उपस्थित होते.

ही यंत्रणा कृत्रिम बुद्धिमत्तेवर आधारित आहे. जेव्हा एखादा हिंस्र प्राणी कॅमेऱ्याच्या टप्प्यात येतो, तेव्हा ही सिस्टम त्याचे विश्लेषण करून त्वरित सायरन वाजवते. यामुळे रात्रीच्या वेळी शेतात जाणाऱ्या शेतकऱ्यांना किंवा वस्तीवरील नागरिकांना बिबट्या जवळ असल्याची पूर्वसूचना मिळेल. शिरूर तालुक्यात आतापर्यंत एकूण १७ ठिकाणी अशी बेस अलार्म सिस्टम बसवण्यात आली आहे. इतर काही गावांबाबतचे प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे पाठवले असून, निधी प्राप्त होताच तिथेही ही यंत्रणा बसवली जाईल, असे वनपरिक्षेत्र अधिकारी नीळकंठ गव्हाणे यांनी सांगितले.

# कोंढव्यात पूर्ववैमन्यासातून तरुणावर तीक्ष्ण हत्याराने हल्ला

पुणे । प्रतिनिधी

पुर्ववैमन्यासातून तरुणावर तीक्ष्ण शस्त्राने वारकरून त्याच्या खूनाचा प्रयत्न केल्याची घटना कोंढव्यातील शिवनेरीनगर भागात शुक्रवारी रात्री ही घटना घडली. हल्यानंतर आरोपी पसार झाला.

गोविंद विनायक हाके (वय २६, रा. कोंढवा खुर्द) असे जखमी झालेल्या तरुणाचे नाव आहे. याप्रकरणी नदीम खान (वय २६, रा शिवनेरीनगर, कोंढवा खुर्द) याच्यावर खूनाचा प्रयत्न केल्याचा गुन्हा दाखल करण्यात आला. आरोपी व तक्रारदार हे एकाच भागात राहण्यास असून त्यांच्यात यापुर्वी वादविवाद झाले होते.

याचा राग आरोपी नदीम याच्या मनात होता. शुक्रवारी रात्री साडे सातच्या सुमारास गोविंद हाके हा त्याच्या काही मित्रांसोबत शिवनेरीनगर येथील गल्ली क्रमांक ८ मध्ये गप्पा मारत थांबला होता. तेव्हा आरोपी हातात तीक्ष्ण हत्याराने त्याच्या डोक्यात वार करून त्याच्या खूनाचा प्रयत्न केला. याचा अधिक तपास कोंढवा पोलिस करत आहेत.

# सावकारी पद्धतीने ४४ लाखांची फसवणूक; माणिकबाग येथील दोन गाळे खरेदीखत करून बळकावल्याचा आरोप

पुणे । प्रतिनिधी

पुणे, सिंहगड रस्त्यावरील माणिकबाग परिसरातील दोन गाळे कुलमुखत्यापत्राचे अगोदर फसवून खरेदीखत केले. त्यानंतर सावकारी पद्धतीने लाखो रुपयांची रक्कम उकळल्यानंतर दोन गाळे (दुकाने) खरेदीखत करून फसवणूक केल्याचा प्रकार समोर आला आहे. याप्रकरणी दोघांवर ४४ लाख रुपयांची फसवणूक केल्याप्रकरणी गुन्हा नोंदवला आहे.

याप्रकरणी सिंहगड रोड पोलिस ठाण्यात हसमुख पारसमल जैन (वय ४२) यांनी तक्रार दिली आहे. त्यानूसार, शेखर बापुसाहेब चिंधे (रा. जांभुळवाडी) व अमित देवराम कलाटे (रा. वाकड) यांच्याविरोधात भारतीय न्याय संहिता कलम ३१८(४), ३१६(२), ३(५) सह सावकारी अधिनियम कलम ३९,४५ नुसार गुन्हा नोंद करण्यात आला आहे. हा सर्व प्रकार मार्च २०२३ ते एप्रिल २०२६ या कालावधीत घडला आहे.

पोलिसांच्या माहितीनुसार, तक्रारदार हे व्यावसायिक आहेत. त्यांचा सराफी व्यावसाय आहे. तक्रारदार यांचे वडिलोपार्जित माणिकबाग परिसरातील कुदळे पाटील प्रॉपर्टीज येथे शेजारी-शेजारी दोन गाळे होते. दरम्यान, वडिलांच्या आजारपणात त्यांनी हे दोन्ही दुकाने बंद केली होती. नंतर त्यांनी एक दुकान भाड्याने दिले व दुसऱ्या दुकानात कपड्यांचा व्यावसाय सुरू केला होता. नंतर पुन्हा त्यांनी २०२२ मध्ये सराफी दुकान सुरू केले. व्यावसाय वाढीसाठी त्यांनी एका फायनान्समधून ५० लाखांचे लोन घेतले होते. पुन्हा पैशांची गरज असल्याने त्यांनी एका ओळखीच्या व्यक्तीमार्फत शेखर चिंधे याच्याकडून २५ लाख रुपये दहा टक्के व्याजाने घेतले. परंतु, त्याबदल्यात एका गाळ्यावर त्यांच्याकडून पॉवर ऑफ अँटर्नी करून घेतली. पण, त्यांच्या खात्यावर २५ ऐवजी ५० लाख रुपये आले दुसरीकडे सबरजिस्टर ऑफिसला चिंधे यांच्या वकिलांनी आधीच तयार केलेल्या कागदपत्रांवर स्वाक्षऱ्या घेतल्या आणि नंतर त्यांचे फोटोही काढले, असल्याचे तक्रारीत म्हंटले आहे.खात्यावर आलेल्या ५० पैकी त्यांनी २५ लाख रुपये मध्यस्थी असलेल्या व्यक्तीला चेकमार्फत परतही दिले. सातत्याने त्यांनी व्याजाने घेतलेले पैसे देण्यासाठी चिंधे हा दमदाटीकरू लागला. तक्रारदार वेळोवेळी त्यांना व्याजाची रक्कम देत होते. यामुळे त्यांनी हा व्यावहार पुर्णकरून विषय मिटविण्याचे ठरविले. नंतर आणखी एका व्यक्तीमार्फत तक्रारदारांनी अमित कलाटे याच्याकडून ३५ लाख रुपये घेतले. त्यांनीही तक्रारदारांच्या दोन्ही दुकानाचे पॉवर ऑफ अँटर्नीकरून घेतली. तीही सबरजिस्टर येथून करून घेण्यात आली. त्याचीही कागदपत्रे आधीच तयार करण्यात आली होती. त्यावर फक्त तक्रारदार यांच्या स्वक्षऱ्या व फोटो घेण्यात आले.

# दारू पिताना मोबाइल चार्जिंगवरून वाद, तरुणाला दगडावर ढकलले

पिंपरी । प्रतिनिधी

मोबाइल चार्जिंगवरून झालेल्या वादातून तरुणाला इंद्रायणी नदीच्या किनारी असलेल्या दगडांवर ढकलून




देऊन गंभीर जखमी केले. ही घटना खेड तालुक्यातील निघोजे येथे गुरुवारी रात्री सव्वाबाराच्या सुमारास घडली आहे.

युवराज जोशी (रा. सुभाषवाडी, निघोजे, ता. खेड, जि. पुणे) याच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गणेशकुमार राजकुमार केवट (वय ३४, रा. निघोजे, मूळ रा. मध्य प्रदेश) असे जखमीचे नाव असून त्यांनी याप्रकरणी दक्षिण महाळुंगे पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. फिर्यादी आणि संशयित नदीच्या जुन्या पुलाजवळ दारू पिण्यासाठी बसले होते. संशयिताने आपला मोबाइल फिर्यादीच्या मित्राकडे चार्जिंगला दिला होता. मुकेश तो वेळेवर घेऊन न आल्याने चिडलेल्या संशयिताने फिर्यादीशी वाद घातला आणि शिवीगाळ करत त्यांना नदीच्या किनारी दगडांवर ढकलून दिले. यात फिर्यादीच्या चेहऱ्याला आणि डोळ्याला गंभीर दुखापत झाली आहे.

# उरुळी कांचनमध्ये बंद फ्लॅटचे कुलूप तोडून ७० हजारांची चोरी

उरुळी कांचन । प्रतिनिधी

घराला कुलूप बघून संधी साधत सदनिकेचे कुलूप हातोड्याने तोडून चोरी करणाऱ्या दोन तरुणांना उरुळी कांचन पोलिसांनी काही तासातच अटक केली.उरुळी कांचनच्या आश्रम रोड परिसरारील राज हाईट्स' अपार्टमेंटमध्ये शनिवारी (दि. २५) दुपारी ३ वाजण्याच्या सुमारास ही घटना घडली.

अनिरुध्द राजेंद्र चौधरी (वय २१,रा.धनगरवस्ती सोरतापवाडी ता.हवेली) व यश सुहास खेडेकर (वय २१ रा.आश्रम रोड,उरुळी कांचन) अशी अटक करण्यात आलेल्या दोन्ही चोरट्यांची नावे आहेत.याप्रकरणी भाग्यश्री नितीनकुमार गुरख (वय ३६ व्यवसाय -शिक्षक रा.आश्रम रोड, राज हाईट्स अपार्टमेंट प्लॅट न २०४ उरुळी कांचन ) यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात फिर्याद दिली होती.वरील दोन्ही आरोपींनी घरातून रोख रक्कम आणि सोन्याची अंगठी असा एकूण ७० हजार ७१० रुपयांचा ऐवज लंपास केला होता.पोलिसांनी तातडीने तपास करत दोन्ही आरोपींच्या मुसक्या आवळल्या असून त्यांच्याकडून चोरीचा सर्व माल हस्तगत केला आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार,उरुळी कांचन हद्दीतील आश्रम रोडवरील 'राज हाईट्स' अपार्टमेंटमध्ये राहणाऱ्या शिक्षिका भाग्यश्री गुरख (वय ३६) या शनिवार दुपारी घराला कुलूप लावून बाहेर गेल्या होत्या.आरोपी अनिरुद्ध चौधरी याने त्यांच्या फ्लॅटचे कुलूप हातोड्याने तोडून आत प्रवेश केला.घरातील बेडरूममधील लोखंडी कपाटाचा ड्रॉवर उचकटून त्याने त्यातील २५ हजार ७१० रुपये रोख रक्कम आणि ४५ हजार रुपये किमतीची अर्धा तोळा वजनाची सोन्याची अंगठी चोरून नेली.घरफोडी झाल्याचे लक्षात येताच भाग्यश्री गुरख यांनी उरुळी कांचन पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. पोलीस तपास पथकाने तातडीने तपासाला सुरुवात करत तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपी अनिरुद्ध चौधरी याला सोरतापवाडी येथून ताब्यात घेतले,त्याच्याकडे अधिक चौकशी केली असता,त्याने ही चोरी त्याचा साथीदार यश खेडेकर याच्या मदतीने केली असल्याची माहिती पोलिसांना दिली. पोलिसांनी दुसरा आरोपी यश खेडेकर यालाही अटक केली. पुढील तपास पोलीस हवालदार चोरमले करीत आहेत.

# बाणेरमध्ये पादचारी तरुणाला अडवून ४० हजारांची लूट; चौघांना पिंपरीतून अटक

पुणे । प्रतिनिधी

पादचारी तरुणाला अडवून अंगझडती घेण्याच्या बहाण्याने ४० हजारांची रोकड लुटून नेणाऱ्या चार जणांना बाणेर पोलिसांनी बेड्या ठोकल्या. सुतारवाडी परिसरातील या घटनेत सीसीटीव्हीच्या मदतीने पोलिसांनी त्यांचा माग काढून त्यांना पिंपरी परिसरातून पकडले.

त्यांच्याकडून गुन्ह्यात वापरलेले दोन दुचाकी जप्त करण्यात आल्या आहेत. दिनेश बाळू मंडपे (वय ३३, रा. पिंपरी), रोहन रमेश सुर्यवंशी (वय ३१), लक्ष्मण कृष्णा वाल्हेकर (वय ४६) व संतोष राम कंपा (वय ३१) यांना अटक करण्यात आली. याप्रकरणी बाणेर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंद आहे. ही कारवाई वरिष्ठ निरीक्षक चंद्रशेखर सावंत यांच्या मार्गदर्शनाखाली सहाय्यक निरीक्षक के. बी. डाबेराव व त्यांच्या पथकाने केली.पोलिसांनी परिसरातील जवळपास ७२ सीसीटीव्ही तपासले. त्यातून आरोपींचा माग काढण्यात आला. त्यात आरोपी पिपंरी परिसरात असल्याची माहिती समोर आली. त्यानूसार पथकाने पाठलाग सुरू केला.

# पुण्यात आरएमसी प्रकल्पांवर कारवाई थांबली? नागरिकांचा संताप

पुणे । प्रतिनिधी

महापालिका प्रशासनाचा 'हातोडा' केवळ सामान्यांसाठीच आहे की काय? असा संतप्त सवाल आता उपस्थित होत आहे. शहरातील आरएमसी प्रकल्पांमुळे होणाऱ्या प्रदूषणाने पुणेकरांचे आरोग्य धोक्यात आले असताना, बड्या राजकीय नेत्यांच्या दबावापुढे महापालिका आयुक्तांसह बांधकाम विभाग सपशेल नतमस्तक झाल्याचे दिसून येत आहे.

लोहगाव-खांदवेनगरमधील कारवाईचा मोठा गाजावाजा करणाऱ्या प्रशासनाला वडगाव खुर्द येथील प्रकल्पांवर कारवाई करण्यासाठी 'मुहूर्त' सापडत नसल्याने पुणेकरांच्या जिवापेक्षा पुढाऱ्यांचे हित मोठे आहे का? असा सवाल नागरिक विचारत आहेत. नागरिकांच्या तक्रारीनंतर लोहगावात सात प्रकल्प जमीनदोस्त करून प्रशासनाने आपण 'सिंघम' असल्याचे भासवले. मात्र, खरा कस वडगाव खुर्दमध्ये लागणार होता. नदीपात्रात आणि रहिवासी भागात असलेल्या या अनधिकृत प्रकल्पांवर पहाटे कारवाईचे नियोजन होते. मात्र, बांधकाम विभागातील एका 'बिभीषणाने' ही माहिती आधीच प्रकल्प मालकांना पोहोचवली. कारवाई होणाऱ्या प्रकल्पांमध्ये राजकीय



हितसंबंध गुंतलेले असल्याने मंत्रालयापासून महापालिकेपर्यंत सूत्रे फिरली आणि पहाटेची ती कारवाई अचानक रद्द करण्यात आली. प्रशासकीय अधिकाऱ्यांनी वारंवार 'कारवाई पुन्हा सुरू होणार' अशा पोकळ वल्गना केल्या. मात्र, पुढाऱ्यांच्या दबावापुढे प्रशासनाचा कणा मोडला आहे. रहिवासी क्षेत्रात धुळीचे लोट सोसणाऱ्या नागरिकांना दमा आणि श्वसनाचे आजार जडले आहेत; पण महापालिकेला केवळ लोहगावचेच प्रदूषण दिसले का? वडगाव खुर्द आणि शहरातील इतर भागांतील अनधिकृत प्रकल्प प्रशासनाच्या डोळ्यांवर राजकीय पट्टी बांधल्यामुळे दिसत नाहीत का? असा प्रश्न विचारला जात आहे.